# महिलांचा राजकीय प्रचार मोहिमेतील सहभागः कर्जत तालुक्याच्या संदर्भात विशेष अभ्यास

**Dr.Chandrakant Mangal.Gondhali**
Associate Professor, KokanGyanpeeth,
Karjat college of Arts Commerce and Science
Karjat, Raigad.
Gmail:gondhalichandrakant@gmail.com

## प्रास्तविक ः

लोकशाहीत राजकीय प्रकिया लोकांच्या सहभागाने साकार होतात.२१व्या शतकात 'राजकीय सहभाग' सर्वच लोकशाही व्यवस्थेत महत्वाचा ठरला आहे.त्यातील महिलांचा राजकीय सहभाग समाजशास्त्रातील महत्वाचा अभ्यासविषय बनला आहे.राजकीय व्यवस्थेत सहभाग मिळविण्यासाठी जगातील विविध भागात लोक संघर्ष करीत आहेत.लोकांचा जास्तीत जास्त सहभाग लोकशाही व्यवस्था बळकट करण्याच्या दृष्टीने आवश्यक असतो. लोकशाही व्यवस्थेत, व्यक्तीचा राजकीय सहभाग अधिकार मानला जातो.नागरिकांच्या राजकीय सहभागामुळे प्रभावी शासन व्यवस्था निर्माण करणे शक्य झाले आहे. संपूर्ण शासनव्यवस्था बदलण्याचे सामर्थ्य ही त्यात आहे.

राजकीय प्रचार हा निवडणुकीच्या दरम्यान करण्यात येणारा एखादया उमेदवाराचा अथवा राजकीय पक्षाचा प्रचार असतो.त्यांचा उपयोग मतदारांवर प्रभाव पाडण्यासाठी केला जातो.प्रजातंत्रात राजकीय प्रचार हा निवडणुक प्रचार म्हणुन समजला जातो.अश्या प्रकारच्या राजकीय प्रचार मोहिमेतील महिलांच्या सहभागाविषयीचा अभ्यास या संशोधन पेपरमध्ये करण्यात आला आहे. निवडणुकीच्या काळात पक्षातर्फे चालविल्या जाणा-या प्रचारमोहिमांना राजकीय सहभागाच्या दृष्टीने अन्यन्यसाधारण महत्व आहे.राजकीय दृष्टया कमालीच्या उदासीन असणा-या व्यक्तीसुध्दा प्रचारमोहिमांच्या प्रभावापासुन पुर्णतया मुक्त राहु शकत नाही.प्रचार मोहिमेचे जसे स्वरूप असते त्यानुसार राजकीय सहभाग असतो.

## संशोधनाची उदिष्टयेः

१. महिलांचा राजकीय प्रचार मोहिमेतील सहभागाचा अभ्यास करणे.
२. क्षेत्रानुसार महिलांचा राजकीय प्रचार मोहिमेतील सहभागाचा अभ्यास करणे.
३. शैक्षणिक, आर्थिक घटकांच्या माध्यमातुन महिलांचा राजकीय प्रचार मोहिमेतील सहभागाचा अभ्यास करणे.

**संशोधन साहित्याचे परिशीलन** (Review of Literature):

Alexis de Tocqueville(1966) 'Democracy in America' अमेरिकेतील महिलांच्या राजकीय सहभागाची चर्चा केली आहे.अमेरिकन लोकशाही व्यवस्थेत समता व स्वातंत्र्य या तत्वाच्या आधारे अमेरिकन स्त्रियांचा तेथील राजकीय व्यवस्थेतील सहभागाचा आढावा घेण्यात आला आहे.निर्णय निर्धारण प्रकियेत अमेरिकेतील महिलांची भूमिका मांडण्यात आली आहे.

Verba,s, Nie, N and Kim, J,(1978) 'Political participation and political equality; A seven nation comparison' अमेरिकेतील महिलांचा स्वांतत्र्य चळवळीतील राजकीय दृष्टीकोन अभ्यासण्यात आला आहे.यांचा प्रभाव तेथील राजकीय व्यवस्थेवर मोठया प्रमाणात झाल्याचे निदर्शनास आले आहे.

Randall, victy, (1982) 'women and politics' राजकारण ही एक कृती असून, महिलांचा सहभाग हा त्याचा एक भाग आहे. सार्वजनिक राजकारणात निर्णय निर्धारण प्रक्रियेचा प्रभाव पडतो. सामाजिकरणाच्या प्रक्रियेत पुरूषांनी महिलांना दूय्यम स्थान दिल्याचे निरिक्षण त्यांनी नोंदविले आहे.

Karen Beckwith, (1986) 'American women and political participation; The impacts of work, Genration and feminism'. अमेरिकन महिलांचा राजकीय सहभाग, त्यांचा स्त्रीवाद, काम आणि नवीन पिढीवर होणारा परिणाम या संदर्भातील अभ्यास या पुस्तकात आहे.या अभ्यासात लेखकांनी अमेरिकेतील स्त्रियांच्या राजकीय सहभागाची पार्श्वभूमी विशद केली आहे.

Lima, Hazel D, (1983), 'Women in local Government in Maharastra'. महाराष्ट्रातील पंचायत संस्थातील जिल्हापरिषद आणि पंचायत समितीमधील महिलांची भूमिका अभ्यासण्यात आली आहे.सामाजिक आणि राजकीय संघटनाच्या माध्यमातून महिला प्रतिनिधित्वासंबंधी जाणीव स्पष्ट करण्यात आली आहे.


पंडीत जी.एस, १९९६ यांनी 'पंचायत राज आणि ग्रामीण महिला' या पुस्तकात महिलांच्या राजकीय सहभागा विषयीच्या विविध बाजु मांडल्या आहेत.यात पंचायतराज व्यवस्थेच्या माध्यमातून महिला सशक्तीकरणासाठी आवश्यक असलेल्या घटकांचे विश्लेषण केले आहे.

**संशोधन पध्दती व चर्चा ः**

भौगोलिक दृष्टया रायगड जिल्हातील कर्जत तालुका हा कोकणातील महत्वाचा तालुका असून जागतिक नकाशात त्यांचे स्थान अक्षांशामध्ये १५°.४८ उ ते २२°.६३उ व रेखांशामध्ये ७२°.३६पू ते ८0°.५४पू इतके आहे. कर्जतचे क्षेत्रफळ ६५१.२ चौ.कि.मी. असून ग्रामीण भागाचे क्षेत्रफळ ६३१.00 चौ.कि.मी. व शहरी भागाचे क्षेत्रफळ २0.२ चौ.कि.मी.आहे.मुबंई व पुणे या महाराष्ट्रातील प्रमुख दोन महानगराच्या मध्यभागी हा तालुका वसलेला आहे.

कर्जत तालुक्यात २०१४ ते २०१९ या कालावधीत झालेल्या नगरपरिषद, ग्रामपंचायती, पंचायत समिती व जिल्हापरिषद निवडणुकीत निवडूण आलेल्या व पदाधिकारी म्हणुन काम केलेल्या महिला लोकप्रतिनिधी यांना या अभ्यासासाठी सम्रग मानण्यात आले आहे. प्रस्तुत अध्ययनासाठी संभ्याव्यता नमुना निवड पध्दतीतील यादृच्छिक नमुना निवड प्रकारानुसार सहेतुक नमुना निवड पध्दतीचा उपयोग करून ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद मधील ३00 महिलांची नमुना निवड केली. मुलाखत व प्रश्नावलीच्या साहयाने तथ्यसंकलन केले. त्यानुसार तथ्यांचे वर्गीकरण करून विश्लेषण केले आहे. निवडणुकीच्या काळात पक्षातर्फे चालविल्या जाणा-या प्रचारमोहिमांना राजकीय सहभागाच्या दृष्टीने अन्यन्यसाधारण महत्व आहे. राजकीय दृष्टया कमालीच्या उदासीन असणा-या व्यक्तीसुध्दा प्रचारमोहिमांच्या प्रभावापासुन पुर्णतया मुक्त राहु शकत नाही. प्रचार मोहिमेचे जसे स्वरूप असते त्यानुसार राजकीय सहभाग असतो.

आकृती कंमाक १ महिलांच्या प्रचार मोहिमेतील सहभाग दर्शविणारा वर्तुळालेख




स्त्रोतः प्राथमिक माहितीवर आधारीत

वरील आकृतीत ३00 महिला प्रतिसादकापैकी १४,२१,व ६५ प्रतिसादक अनुक्रमे राजकीय सहभागाच्या सक्रिय सहभाग,स्थितीप्रिय सहभाग व निष्कीय सहभाग या प्रकारात मोडतात. सक्रिय सहभाग प्रकारात महिला निवडणुक प्रचार प्रकियेत प्रत्यक्ष सहभागी होतात. या गटातील महिला लहान लहान गटात प्रचाराच्या रॅलीत सहभागी होतात. पक्षाची पत्रके वाटणे तसेच मतदार यादीतील मतदारांना त्यांच्या नावाच्या स्लिपा भरून देण्याचे काम करतात. मतदानाच्या वेळी मतदान केंद्रावर पक्ष प्रतिनिधी म्हणून काम पाहतात. दुस-या प्रकारातील महिलांचा सहभाग हा स्थितीप्रिय सहभागाच्या प्रकारात येतात. या प्रकारातील राजकीय सहभाग हा अप्रत्यक्ष सहभाग असतो. या प्रकारात मतदान प्रचारासाठी आपल्या नात्यातील मतदारांना आपल्या पक्षाच्या उमेदवारांस मतदान करण्यासाठी तयार करतात. मित्रमंडळी तसेच दुरसंचार माध्यमांचा वापर करून मतदारांना मतदान करण्यास प्रवृत्त करतात. यासाठी विविध गैरसरकारी संघटनाच्या माध्यमातुन मतदाराना मतदान करण्यास प्रवृत्त केले जाते. तिसरा राजकीय सहभागाचा प्रकार हा नकारात्मक असून या प्रकारात निष्क्रिय राजकीय सहभागाचा समावेश होतो. या गटातील मतदार पहिल्या व दुस-या प्रकारातील मतदाराप्रमाणे राजकारणात सहभागी होत नाही.

वरील आकृतीत विविध वयोगटातील १00 महिला प्रतिसादकापैकी १४ टक्के महिला या निवडणुकांच्या प्रचार कार्यात प्रत्यक्ष सहभागी होतात. या सहभागात पक्षातील उमेदवाराच्या प्रचार रॅलीत सहभागी होणे, राजकीय सभाना हजर राहणे,पक्षाचे उमेदवार म्हणून निवडणुक लढविणे, पक्षनिधी गोळा करणे, पक्षाची कार्यालये व दैनंदिन कामकाज सांभाळणे. पक्षाची अधिवेशने व बैठकांना हजर राहणे या प्रकारचा सहभाग सक्रिय सहभागात होत असतो. यालाच प्रत्यक्ष सहभाग असे म्हटले जाते. या प्रकारातील सहभागी राजकीय सहभागाच्या संदर्भात "राजकीय पक्षाचे कियाशील व पुर्णवेळ कार्यकर्ते "असतात. अप्रत्यक्ष सहभाग असणा-या शहरी महिला प्रतिसादकांची संख्या २१ असून सदर अभ्यासात राजकीय सहभाग अपत्यक्षरित्या नोंदविणा-या महिलांचे प्रमाण जास्त आहे. या प्रकारच्या सहभागात महिला नातेवाईक, मित्र यांना दुरध्वनीच्या माध्यमातुन आपल्या पक्षाच्या उमेदवाराबाबत प्रचार करतात. गैरराजकीय संघटनाच्या माध्यमातुन प्रचाराची धुरा सांभाळली जाते. अशा प्रकारचा प्रचार हा अपत्यक्षरित्या होत असतो. वरील अभ्यासात २१ टक्के प्रचार अप्रत्यक्षरीत्या होत असल्याचे दिसते. राजकीय पक्षाच्या प्रचार मोहिमेत सहभाग न घेणा-या शहरी महिलां प्रतिसादकांची संख्या ६५ असुन त्यांचे शेकडा प्रमाण ६५टक्के एवढे आहे.

तक्ता कंमाक १. क्षेत्र आणि महिलांचा प्रचार मोहिमेतील सहभाग दर्शविणारा तक्ता

| क्षेत्र | प्रत्यक्ष सहभाग | | अप्रत्यक्ष सहभाग | | निष्क्रिय सहभाग | | एकुण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | वारंवारीता | टक्केवारी | वारंवारीता | टक्केवारी | वारंवारीता | टक्केवारी | वारंवारीता | टक्केवारी |
| ग्रामीण | २४ | १६.0 | ३0 | २0.0 | ९६ | ६४.0 | १५0 | ५0.0 |
| शहरी | १४ | १७.५ | १८ | २२.५ | ४८ | ६0.0 | ८0 | २६.७ |
| आदिवासी | 0४ | ५.७ | १५ | २१.४ | ५१ | ७२.९ | ७0 | २३.३ |
| एकुण | ४२ | १४.0 | ६३ | २१.0 | १९५ | ६५.0 | ३00 | १00 |

स्त्रोतःप्राथमिक माहितीवर आधारीत

वरील तक्त्यात क्षेत्रानुसार महिलांच्या प्रचार करणाच्या मोहिमेतील सहभागाची आकडेवारी दर्शविण्यात आली आहे. लोकवस्तीतील मतदारांवर प्रभाव पाडुन प्रचाराची रणनिती आखली जाते. महिलावर त्यांच्या क्षेत्राच्या प्रभावाची आकडेवारी वरील तक्त्यात दिली असुन ३00 महिला प्रतिसादकापैकी १५0 महिला ग्रामीण समुदायाच्या असुन त्यातील १६ टक्के प्रतिसादक प्रत्यक्ष प्रचार मोहिमेत सहभागी होतात. २0टक्के महिला अप्रत्यक्ष राजकीय प्रचाराच्या मोहिमेत सहभागी होतात. ६४ टक्के महिला राजकीय प्रचार मोहिमेच्या बाबतीत निष्क्रीय आहेत. ८0 महिला शहरी समुदायाच्या असुन त्यातील १७.५ टक्के प्रतिसादक प्रत्यक्ष प्रचार मोहिमेत सहभागी होतात. २२.५टक्के महिला अप्रत्यक्ष राजकीय प्रचाराच्या मोहिमेत सहभागी होतात. ६0 टक्के महिला राजकीय प्रचार मोहिमेच्या बाबतीत निष्क्रीय आहेत. ७0 महिला आदिवासी

Sanshodhan Chetana | Mar 2021

समुदायाच्या असुन त्यातील ५.७ टक्के प्रतिसादक प्रत्यक्ष प्रचार मोहिमेत सहभागी होतात. २१.४टक्के महिला अप्रत्यक्ष राजकीय प्रचाराच्या मोहिमेत सहभागी होतात.७२.९ टक्के महिला राजकीय प्रचार मोहिमेच्या बाबतीत निष्क्रीय आहेत.

कर्जत तालुक्यातील मतदार असलेल्या महिलांचा त्यांच्या राहण्याच्या क्षेत्रानुसार प्रचार मोहिमेतील सहभागाच्या अभ्यासावरून असे दिसून येते की, शहरी क्षेत्रातील महिलांचा प्रचार मोहिमेतील प्रत्यक्ष सहभाग १७.५टक्के आहे. ग्रामीण क्षेत्रातील महिलांचा प्रचार मोहिमेतील प्रत्यक्ष सहभाग १६टक्के आहे.आदिवासी क्षेत्रातील महिलांचा प्रचार मोहिमेतील प्रत्यक्ष सहभाग ५.७टक्के आहे.यावरून हे सिद्ध होते की, आदिवासी महिलांचा प्रचार मोहिमेतील प्रत्यक्ष सहभाग कमी आहे.

तक्ता कंमाक २. वय आणि महिलांचा प्रचार मोहिमेतील सहभाग

| वयोगट | प्रत्यक्ष सहभाग | | अप्रत्यक्ष सहभाग | | निष्क्रिय सहभाग | | एकुण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | वारंवारीता | टक्केवारी | वारंवारीता | टक्केवारी | वारंवारीता | टक्केवारी | वारंवारीता | टक्केवारी |
| १८ ते २५ | १0 | २५.६ | ५ | १२.८ | २४ | ६१.५ | ३९ | १३.0 |
| २६ते ३५ | १२ | १४.३ | ३0 | ३५.७ | ४२ | ५0.0 | ८४ | २८.0 |
| ३६ते४५ | १७ | १५.५ | १६ | १४.५ | ७७ | ७0.0 | ११0 | ३६.७ |
| ४६ते५५ | 0२ | ४.३ | ११ | २३.४ | ३४ | ७२.३ | ४७ | १५.७ |
| ५६च्या पुढील | १ | ५.0 | १ | ५.0 | १८ | ९0.0 | २0 | 0६.७ |
| एकुण | ४२ | १४.0 | ६३ | २१.0 | १९५ | ६५.0 | ३00 | १00 |

स्त्रोतः प्राथमिक माहितीवर आधारीत

वरील तक्त्यानुसार विविध वयोगटातील महिलांचा राजकीय प्रचार मोहिमेतील सहभाग दर्शविण्यात आलेला आहे.आडव्या रांगेत राजकीय प्रचार मोहिमतील सहभाग दर्शविला असून प्रत्यक्ष सहभागात प्रचार रॅलीतील सहभाग आणि राजकीय सभातील सहभागाची आकडेवारी देण्यात आली आहे.अप्रत्यक्ष सहभागात नातेवाईक, मित्रमंडळी व संचार माध्यमातुन राजकीय पक्षाच्या प्रचार मोहिमेतील सहभाग दर्शविण्यात आला आहे.निष्क्रीय सहभागात ज्या महिला राजकीय प्रचाराच्या मोहिमेत कधीही सहभागी होत नाहीत ते दर्शविण्यात आले आहे.आडव्या रांगेत शहरी भागातील महिलांचे वयोगट दर्शविण्यात आले आहेत.यात महिलांचे पाच वयोगटात वर्गीकरण करण्यात आले असुन १८ ते २५, २६ते३५, ३६ते४५, ४६ते५५ व ५५वर्षावरील वयोगटाचा समावेश होतो.वरील तक्त्यात ३00 शहरी महिला प्रतिसादकांकडुन त्यांचा राजकीय प्रचार मोहिमेतील सहभाग दर्शविण्यात आला आहे.

वरील आकडेवारीनुसार १८ते२५ या वयोगटातील एकुण ३९महिला प्रतिसादक असुन त्यांचा प्रचार मोहिमेतील सहभाग अनुक्रमे प्रत्यक्ष सहभाग २५ .६टक्के ,अप्रत्यक्ष सहभाग १२ .८ आणि निष्क्रीय सहभाग ६१ .५टक्के आढळुन आला .२६ते ३५ या वयोगटातील एकुण ८४ महिला प्रतिसादक असून त्यांचा प्रचार मोहिमेतील सहभाग हा अनुक्रमे प्रत्यक्ष सहभाग १४ .३टक्के ,अप्रत्यक्ष सहभाग ३५ .७टक्के आणि निष्क्रीय सहभाग ५0 टक्के एवढा दिसून आला .

३६ते ४५ या वयोगटातील एकुण ११0 महिला प्रतिसादक असून त्यांचा प्रचार मोहिमेतील सहभाग अनुक्रमे प्रत्यक्ष सहभाग १५ .५टक्के ,अप्रत्यक्ष सहभाग १४ .५टक्के आणि निष्क्रीय सहभाग ७0 टक्के दिसून आला. ४६ते ५५ या वयोगटातील एकुण ४७ महिला प्रतिसादक असून त्यांचा प्रचार मोहिमेतील सहभाग अनुक्रमे प्रत्यक्ष सहभाग ४ .३टक्के ,अप्रत्यक्ष सहभाग २३ .४ टक्के आणि निष्क्रीय सहभाग ७२ .३टक्के दिसून आला. ५५ पेक्षा वरील वयोगटातील एकुण २0 महिला प्रतिसादक असुन त्यांचा प्रचार मोहिमेतील सहभाग अनुक्रमे प्रत्यक्ष सहभाग ५ टक्के,अप्रत्यक्ष सहभाग ५ टक्के आणि निष्क्रीय सहभाग ९0 टक्के दिसून आला .

वरील तक्त्ााच्या अभ्यासावरून असे निर्दशनास येते की, १८ ते ५५ या वयोगटातील महिलांचा निवडणुकांतील राजकीय पक्षाच्या प्रचारातील सहभाग हा थोडया फार फरकाने सारखाच असलेला दिसतो .अपत्यक्षरित्या महिलांच्या प्रचारकार्यातील सहभाग जास्त असुन ५५ वर्षावरील महिला निवडणुकांच्या प्रचार कार्यात फारच कमी संख्यने भाग घेतात .सहभाग कमी असण्याची कारणे जाणुन घेता असे लक्षात आले की, वय वाढल्याने दगदग सहन होत नाही .शरीर साथ देत नाही .विविध प्रकारच्या व्याधी असल्याने सक्रिय सहभागावर मर्यादा पडतात .

कर्जत तालुक्यातील मतदार असलेल्या महिलांचा त्यांच्या वयोगटानुसार प्रचार मोहिमेतील सहभागाच्या अभ्यासावरून असे दिसुन येते की, १८ ते ३५ महिलांचा प्रचार मोहिमेतील प्रत्यक्ष सहभाग २५ .६टक्के आहे. ३६ ते ४५महिलांचा प्रचार मोहिमेतील प्रत्यक्ष सहभाग १५ .५टक्के आहे .४५ ते ५५ महिलांचा प्रचार मोहिमेतील निष्क्रिय सहभाग ९0टक्के आहे .यावरून हे सिद्व होते की, वाढत्या वयोगटानुसार प्रचार मोहिमेतील प्रत्यक्ष सहभाग हा कमी कमी झालेला दिसतो आहे .

Sanshodhan Chetana | Mar 2021

तक्ता कंमाक ३ . शैक्षणिक पात्रता आणि महिलांचा प्रचार मोहिमेतील  सहभाग दर्शविणारा तक्ता

| शैक्षणिक पात्रता | प्रत्यक्ष सहभाग | | अप्रत्यक्ष  सहभाग | | निष्क्रिय सहभाग | | एकुण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | वारंवारीता | टक्केवारी | वारंवारीता | टक्केवारी | वारंवारीता | टक्केवारी | वारंवारीता | टक्केवारी |
| निरक्षर | ०२ | ४ .३ | ०३ | ६ .५ | ४१ | ८९ .१ | ४६ | १५ .३ |
| प्राथमिक १ते४ | १३ | १० .७ | २१ | १७ .४ | ८७ | ७१ .९ | १२१ | ४० .३ |
| माध्यमिक ५ते१० | ११ | १३ .१ | २९ | ३४ .५ | ४४ | ५२ .४ | ८४ | २८ .० |
| उच्चमाध्यमिक११ते१२ | ०३ | ११ .५ | ०७ | २६ .९ | १६ | ६१ .६ | २६ | ८ .७ |
| पदवीधर | ०४ | २८ .६ | ०३ | २१ .४ | ०७ | ५० .० | १४ | ४ .७ |
| पदव्युत्तर | ०९ | १०० | ०० | ०० | ०० | ०० | ०९ | ३ .० |
| एकुण | ४२ | १४ .० | ६३ | २१ .० | १९५ | ६५ .० | ३०० | १०० |

स्त्रोतःप्राथमिक माहितीवर आधारीत

वरील तक्त्यात महिलांचा शैक्षणिक पात्रतेच्या आधारावर निवडणुकीतील उमेदवाराच्या प्रचार मोहिमेतील सहभागाची आकडेवारी देण्यात आली आहे .३०० महिला प्रतिसादकांपैकी निरक्षर  महिला प्रतिसादक ४६ असून एकुण प्रतिसादकांपैकी त्यांचे शेकडा प्रमाण १५ .३ टक्के आहे .०२निरक्षर महिला प्रतिसादक प्रत्यक्ष राजकीय प्रचार मोहिमेत सहभागी होतात त्यांचे निरक्षर गटातील  प्रमाण ४ .३ टक्के आहे .या गटातील ०३ महिला प्रतिसादक अप्रत्यक्षरित्या राजकीय प्रचारमोहिमेत सहभागी होतात त्यांचे निरक्षर गटातील प्रमाण ६ .५ टक्के आहे . राजकीय निवडणुकीतील उमेदवाराच्या प्रचार मोहिमेतील निष्क्रीय सहभाग असलेल्या निरक्षर गटातील महिला प्रतिसादकांची संख्या ४१ असून त्यांचे प्रमाण ८९ .१ टक्के आहे .

प्राथमिक शिक्षण घेतलेल्या महिला प्रतिसादक १२१ असून एकुण प्रतिसादकांपैकी त्यांचे शेकडा प्रमाण  ४० .३ टक्के आहे . प्राथमिक शिक्षण घेतलेल्या १३ महिला प्रतिसादक प्रत्यक्ष राजकीय प्रचार मोहिमेत सहभागी होतात त्यांचे प्राथमिक शिक्षण गटातील  प्रमाण १० .७  टक्के आहे .या गटातील २१ महिला प्रतिसादक अप्रत्यक्षरित्या राजकीय प्रचारमोहिमेत सहभागी होतात त्यांचे प्राथमिक शिक्षण गटातील प्रमाण १७ .४ टक्के आहे . राजकीय निवडणुकीतील उमेदवाराच्या प्रचार मोहिमेतील निष्क्रीय सहभाग असलेल्या प्राथमिक शिक्षण गटातील महिला प्रतिसादकांची संख्या ८७ असून त्यांचे प्रमाण ७१ .९टक्के आहे .

माध्यमिक शिक्षण घेतलेल्या महिला प्रतिसादक ८४ असून एकुण प्रतिसादकांपैकी त्यांचे शेकडा प्रमाण  २८ टक्के आहे .माध्यमिक शिक्षण घेतलेल्या ११ महिला प्रतिसादक प्रत्यक्ष राजकीय प्रचार मोहिमेत सहभागी होतात त्यांचे माध्यमिक

शिक्षण गटातील प्रमाण १३.१ टक्के आहे.या गटातील २९ महिला प्रतिसादक अप्रत्यक्षरित्या राजकीय प्रचारमोहिमेत सहभागी होतात त्यांचे माध्यमिक शिक्षण गटातील प्रमाण ३४.५ टक्के आहे. राजकीय निवडणूकीतील उमेदवाराच्या प्रचार मोहिमेतील निष्क्रीय सहभाग असलेल्या माध्यमिक शिक्षण गटातील महिला प्रतिसादकांची संख्या ४४ असुन त्यांचे प्रमाण ५२.४टक्के आहे.

उच्चमाध्यमिक शिक्षण घेतलेल्या महिला प्रतिसादक २६ असून एकुण प्रतिसादकापैकी त्यांचे शेकडा प्रमाण ८.७ टक्के आहे.उच्चमाध्यमिक शिक्षण घेतलेल्या ०३ महिला प्रतिसादक प्रत्यक्ष राजकीय प्रचार मोहिमेत सहभागी होतात त्यांचे उच्च माध्यमिक शिक्षण गटातील प्रमाण ११.५ टक्के आहे.या गटातील ०७ महिला प्रतिसादक अप्रत्यक्षरित्या राजकीय प्रचारमोहिमेत सहभागी होतात त्यांचे उच्चमाध्यमिक शिक्षण गटातील प्रमाण २६.९ टक्के आहे. राजकीय निवडणुकीतील उमेदवाराच्या प्रचार मोहिमेतील निष्क्रीय सहभाग असलेल्या उच्च माध्यमिक शिक्षण गटातील महिला प्रतिसादकांची संख्या १६ असुन त्यांचे प्रमाण ६१.६ टक्के आहे.

पदवी शिक्षण घेतलेल्या महिला प्रतिसादक १४ असून एकुण प्रतिसादकापैकी त्यांचे शेकडा प्रमाण ४.७ टक्के एवढे आहे.पदवी शिक्षण घेतलेल्या ०४ महिला प्रतिसादक प्रत्यक्ष राजकीय प्रचार मोहिमेत सहभागी होतात त्यांचे पदवी शिक्षण गटातील प्रमाण २८.६ टक्के आहे. पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्या महिला प्रतिसादक ०९ असुन एकुण प्रतिसादकापैकी त्यांचे शेकडा प्रमाण ३टक्के आहे. पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्या ०९ महिला प्रतिसादक प्रत्यक्ष राजकीय प्रचार मोहिमेत सहभागी होतात त्यांचे पदव्युत्तर शिक्षण गटातील प्रमाण १०० टक्के आहे.

महिलांच्या शैक्षणिक पात्रतेत वाढ होत जाते तस तशी त्यांची प्रचार मोहिमेतील प्रत्यक्ष सहभाग वाढलेला दिसून येतो.निरक्षर असलेल्या महिलांमध्ये प्रत्यक्ष प्रचार मोहिमेतील सहभागाचे प्रमाण ४.२टक्के आहे. प्राथमिक शिक्षण घेतलेल्या महिलांमध्ये हे प्रमाण १०.७टक्के असल्याचे दिसून येते. माध्यमिक शिक्षण घेतलेल्या महिलांमध्य हे प्रमाण १३.१टक्के इतके असल्याचे दिसून येते. पदवी शिक्षण घेतलेल्या महिलांमध्ये हे प्रमाण २८.६टक्के असल्याचे दिसून येते. पदव्यूत्तर शिक्षण घेतलेल्या महिलांमध्ये हे प्रमाण १००टक्के असल्याचे दिसून येते.

तक्ता कमांक ४.मासिक उत्पन्न आणि महिलांचा प्रचार मोहिमेतील सहभाग दर्शविणारा तक्ता

| मासिक उत्पन्न | प्रत्यक्ष सहभाग | | अप्रत्यक्ष सहभाग | | निष्क्रिय सहभाग | | एकुण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | वारंवारीता | टक्केवारी | वारंवारीता | टक्केवारी | वारंवारीता | टक्केवारी | वारंवारीता | टक्केवारी |
| १ते १००० | ०२ | ६.५ | ०३ | ९.७ | २६ | ८३.८ | ३१ | १०.३ |
| १००१ते २हजार | ०८ | ७.७ | २० | १९.२ | ७६ | ७३.१ | १०४ | ३४.७ |
| २००१ते४००० | १० | ११.८ | २४ | २८.२ | ५१ | ६०.० | ८५ | २८.३ |

Sanshodhan Chetana | Mar 2021

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४00१ते६000 | 0६ | १४.0 | १0 | २३.३ | २७ | ६२.७ | ४३ | १४.३ |
| ६00१ते८हजार | 0४ | २0.0 | 0३ | १५.0 | १३ | ६५.0 | २0 | ६.७ |
| ८00१ते१0हजार | 0८ | ६१.५ | 0३ | २३.१ | 0२ | १५.४ | १३ | ४.३ |
| १0हजारावर | 0४ | १00 | 00 | 00 | 00 | 00 | 0४ | १.३ |
| एकुण | ४२ | १४.0 | ६३ | २१.0 | १९५ | ६५.0 | ३00 | १00 |

स्त्रोतःप्राथमिक माहितीवर आधारीत

वरील तक्त्यात महिलांचा मासिक उत्पन्नाच्या आधारावर निवडणूकीतील प्रचार मोहिमेतील सहभागाची आकडेवारी देण्यात आली आहे.३00 महिला प्रतिसादकापैकी एक हजार रूपये पर्यत उत्पन्न असणा-या ३१ महिला प्रतिसादक असून एकुण प्रतिसादकापैकी त्यांचे शेकडा प्रमाण १0.३ टक्के आहे.एक हजार रूपये पर्यत उत्पन्न असणा-या 0२ महिला प्रतिसादक या प्रत्यक्ष राजकीय प्रचार मोहिमेत सहभागी होतात. त्यांचे एक हजार रूपये पर्यत उत्पन्न असणा-या गटातील प्रमाण ६.५टक्के आहे.या गटातील 0३ महिला प्रतिसादक या अप्रत्यक्षरित्या राजकीय प्रचारमोहिमेत सहभागी होतात. त्यांचे एक हजार रूपये पर्यत उत्पन्न असणा-या गटातील प्रमाण ९.७टक्के आहे. राजकीय निवडणुकीतील प्रचार मोहिमेतील निष्कीय सहभाग असलेल्या एक हजार रूपये पर्यत उत्पन्न असणा-या गटातील महिला प्रतिसादकांची संख्या २६असुन त्यांचे प्रमाण ८३.८टक्के आहे.

१00१ ते २हजार रूपये पर्यत उत्पन्न असणा-या १0४ महिला प्रतिसादक असून एकुण प्रतिसादकापैकी त्यांचे शेकडा प्रमाण ३४.७ टक्के आहे. १00१ते २हजार रूपये पर्यत उत्पन्न असणा-या 0८ महिला प्रतिसादक हया प्रत्यक्ष राजकीय प्रचार मोहिमेत सहभागी होतात त्यांचे १00१ ते २हजार रूपये पर्यत उत्पन्न असणा-या गटातील प्रमाण ७.७ टक्के आहे.या गटातील २0 महिला प्रतिसादक हया अप्रत्यक्षरित्या राजकीय प्रचारमोहिमेत सहभागी होतात त्यांचे १00१ते २हजार रूपये पर्यत उत्पन्न असणा-या गटातील प्रमाण १९.२टक्के आहे. निवडणुकीतील उमेदवाराच्या प्रचार मोहिमेतील निष्कीय सहभाग असलेल्या १00१ते २हजार रूपये पर्यतउत्पन्न असणा-या गटातील महिला प्रतिसादकांची संख्या ७६ असुन त्यांचे प्रमाण ७३.१टक्के आहे.

२00१ ते ४हजार रूपये पर्यत उत्पन्न असणा-या ८५ महिला प्रतिसादक असून एकुण प्रतिसादकापैकी त्यांचे शेकडा प्रमाण २८.३ टक्के आहे. २00१ते ४हजार रूपये पर्यत उत्पन्न असणा-या १0 महिला प्रतिसादक या प्रत्यक्ष राजकीय प्रचार मोहिमेत सहभागी होतात त्यांचे २00१ते २हजार रूपये पर्यत उत्पन्न असणा-या गटातील प्रमाण ११.८टक्के आहे.या गटातील २४ महिला प्रतिसादक या अप्रत्यक्षरित्या राजकीय प्रचारमोहिमेत सहभागी होतात त्यांचे२00१ते ४हजार रूपये पर्यत उत्पन्न असणा-या गटातील प्रमाण २८.२टक्के आहे.

Sanshodhan Chetana I Mar 2021

निवडणुकीतील प्रचार मोहिमेतील निष्क्रीय सहभाग असलेल्या २००१ते ४ हजारांपर्यत उत्पन्न असणा-या गटातील महिला प्रतिसादकांची संख्या ५१असून त्यांचे प्रमाण ६० टक्के आहे.४००१ते ६हजार रूपये पर्यत उत्पन्न असणा-या ४३ महिला प्रतिसादक असून एकुण प्रतिसादकापैकी त्यांचे शेकडा प्रमाण १४.३टक्के आहेनिवडणुकीतील प्रचार मोहिमेतील निष्क्रीय सहभाग असलेल्या ४००१ते ६हजार रूपये पर्यत उत्पन्न असणा-या गटातील महिला प्रतिसादकांची संख्या २७असून त्यांचे प्रमाण ६२.७ टक्के आहे.६००१ते ८हजार रूपये पर्यत उत्पन्न असणा-या २० महिला प्रतिसादक असून एकुण प्रतिसादकापैकी त्यांचे शेकडा प्रमाण ६.७टक्के आहे. ६००१ते ८हजार रूपये पर्यत उत्पन्न असणा-या ०४ महिला प्रतिसादक या प्रत्यक्ष राजकीय प्रचार मोहिमेत सहभागी होतात त्यांचे ६००१ते ८हजार रूपये पर्यत उत्पन्न असणा-या गटातील प्रमाण २०टक्के आहे.या गटातील ०३ महिला प्रतिसादक या अप्रत्यक्षरित्या राजकीय प्रचारमोहिमेत सहभागी होतात त्यांचे६००१ते ८हजारापर्यत उत्पन्न असणा-या गटातील प्रमाण १५टक्के आहे.

निवडणुकीतील प्रचार मोहिमेतील निष्क्रीय सहभाग असलेल्या ६००१ते ८हजारा पर्यत उत्पन्न असणा-या गटातील महिला प्रतिसादकांची संख्या १३असून त्यांचे प्रमाण ६५ टक्के आहे.८००१ते १०हजारापर्यत उत्पन्न असणा-या १३ महिला प्रतिसादक असून एकुण प्रतिसादकापैकी त्यांचे शेकडा प्रमाण ४.३टक्के आहे. ८००१ते १०हजार रूपये पर्यत उत्पन्न असणा-या ०८ महिला प्रतिसादक हया प्रत्यक्ष राजकीय प्रचार मोहिमेत सहभागी होतात त्यांचे ८००१ते १०हजारापर्यत उत्पन्न असणा-या गटातील प्रमाण ६१.५टक्के आहे.या गटातील ०३ महिला प्रतिसादक या अप्रत्यक्षरित्या राजकीय प्रचारमोहिमेत सहभागी होतात त्यांचे८००१ते १०हजार रूपये पर्यत उत्पन्न असणा-या गटातील प्रमाण २३.१टक्के आहे.

निवडणुकीतील प्रचार मोहिमेतील निष्क्रीय सहभाग असलेल्या ८००१ते १०हजार रूपये पर्यत उत्पन्न असणा-या गटातील महिला प्रतिसादकांची संख्या ०२असून त्यांचे प्रमाण १५.४ टक्के आहे.१०हजार रूपये पेक्षा जास्त उत्पन्न असणा-या ०४ महिला प्रतिसादक असून एकुण प्रतिसादकापैकी त्यांचे शेकडा प्रमाण १.३३टक्के एवढे आहे.

१०हजार रूपये पेक्षा जास्त उत्पन्न असणा-या ०४महिला प्रतिसादक या प्रत्यक्ष राजकीय प्रचार मोहिमेत सहभागी होतात त्यांचे १०हजारापेक्षा जास्तउत्पन्न असणा-या गटातील प्रमाण १००टक्के आहे.

**निष्कर्षः**

- कमी आर्थिक प्राप्ती असलेल्या महिला या मतदान करण्यास जात नाहीत त्यामुळे त्यांचा राजकीय सहभाग हा कमी असलेला दिसून येतो.
- राजकीय निवडणुकीतील उमेदवारांच्या प्रचार मोहिमेतील निष्क्रीय सहभाग असलेल्या निरक्षर गटातील महिलांचे प्रमाण ८९.१ टक्के आहे.महिलांच्या शैक्षणिक पात्रतेत वाढ होते. तसा त्यांचा प्रचार मोहिमेतील प्रत्यक्ष सहभाग वाढलेला दिसुन येतो. पदव्यूत्तर शिक्षण घेतलेल्या महिलांमध्य हे प्रमाण १००टक्के असल्याचे दिसुन येते.
- आदिवासी समुदायाच्या ५.७ टक्के प्रतिसादक महिला प्रत्यक्ष प्रचार मोहिमेत सहभागी होतात.

**शिफारसी ः**

- महिलामध्ये आत्मविश्वास वाढावा यासाठी त्यांना प्रशिक्षण देण्याची आवश्यकता आहे .
- आदिवासी महिलांमध्ये शिक्षणाचा अभाव असल्याने त्यांना शिक्षण दिले पाहिजे .
- राजकीय व्यवस्थेविषयीची माहिती होण्यासाठी महिलांचे मेळावे भरवुन त्यांना राजकारणाविषयीची माहिती देण्यासाठी राजकीय पक्षांनी पुढाकार घ्यावा .
- ग्रामीण व आदिवासी भागातील महिलांच्या राजकीय जाणिवा प्रगल्भ व्हाव्यात .यादृष्टीने ग्रामस्तरावर नेतुत्वगुण विकसीत करणा-या कार्यशाळा शासनाने आयोजित कराव्यात .
- पुरूषी मानसिकतेमुळे स्त्रियांना विविध समस्यांना समोरे जावे लागते .या अडचणी व समस्या सोडविण्यासाठी तालुका स्तरावर स्थानिक स्वराज्य संस्था महिला तकार निवारण कक्षाची स्थापना करावी .
- महिलांची राजकीय पक्षामध्ये सदस्य नोंदणी करून त्यांना राजकीय पक्षात महत्वाची पदे देण्यात यावी .

**संदर्भग्रंथसूची ः**


1. Alexis de Tocqueville, Democracy in America, Harper and Row, New York, 1966.p.49
2. Verba,s, Nie, N and Kim, J, Political participation and political equality; A seven nation comparison,Cambridge University press,1978 p.56
3. Randall, victy,women and politics,Macmillon press, New York,1982.p.98
4. .Karen Beckwith, American Women and Political Participation: The Impacts of Work, Generation, and Feminism ,Greenwood Press, New York, 1986.p.78
5. .Lima, Hazel D, Women in local Government in Maharastra,concept publishers,New Delhi,1983. P.43

६ . पंडीत जी .एस, 'पंचायत राज आणि ग्रामीण महिला', पुणे, १९९६ . पृ .२२

७ . डॉ .भास्कर लक्ष्मण भोळे, राजकीय विश्लेषण, पिंपळापुरे बुक डिस्ट्रिब्युटर्स ,नागपुर, २००८ पृ .२०९


Sanshodhan Chetana | Mar 2021